# विभागीय आयुक्त कार्यालय (पुरवठा विभाग), अमरावती

ईमेल- dycomms.amt@gmail.com दुरध्वनी क्रमांक ०७२१-२६६२६६६

# जाहिरात

## पुरवठा निरीक्षक संवर्ग सरळसेवा पदभरती - २०१७

**जाहिरात क्रमांक आकाआ/पुरवठा४ /प्र.क्र.- ५१० /२०१७, दि. २५ मे २०१७.**

महाराष्ट्र शासन, अन्न व नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग परिपत्रक क्रमांक आस्थाप्र २०१५/प्र.क्र.४७९/ ना.पु. १५, दि. २०.०९.२०१७ अन्वये दिलेल्या निर्देशानुसार विभागीय आयुक्त, अमरावती विभाग, अमरावती यांचे आस्थापनेवरील पुरवठा निरीक्षक, संवर्गातीले पदाकरीता खाली नमूद केलेल्या प्रवर्गातील उमेदवारांकडून दि. १२ जून २०१७ रोजी रात्री, २३.५९ वाजेपर्यंत फक्त (ऑन लाईन) पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. ऑन लाईन व्यतिरिक्त, इतर कोणत्याही पध्दतीने अर्ज स्विकारले जाणार नाही. या पदासाठी अर्हता प्राप्त असलेले उमेदवार फक्त अर्ज करू शकतात.

**प्रवर्ग निहाय भरती करावयाच्या पदांचा तपशिल**

| प्रवर्ग | एकुण पदे | समांतर आरक्षण | | | | | | | समांतर आरक्षणा व्यतिरिक्त (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | माजी सैनिक | अंश कालीन | महिला | खेळाडु | भूकंप ग्रस्त | प्रकल्पग्रस्त | अपंग (कर्ण बधीर) | |
| अ.जा. (१३ %) | ५ | १ | १ | २ | ० | ० | ० | ० | १ |
| अ.ज. (७ %) | २ | ० | ० | १ | ० | ० | ० | ० | १ |
| वि.जा.(अ)(३ %) | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| भ.ज.-ब (२.५ ) | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| भ.ज.क( ३.५ %) | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| भ ज-ड ( २ %) | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| वि.मा.प्र. ( २ %) | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| इ.मा.व.( १९ %) | ७ | १ | १ | २ | ० | ० | ० | ० | ३ |
| खुला | १८ | ३ | २ | ५ | १ | ० | १ | १ | ५ |
| **एकुण** | ३७ | ५ | ४ | १० | १ | ० | १ | १ | १५ |

**टिप :** १) वर नमुद केलेल्या पदसंख्येत व आरक्षणात बदल होण्याची शक्यता आहे. त्याबाबतचा संपूर्ण अधिकार अध्यक्ष, विभागीय निवड समिती तथा विभागीय आयुक्त, अमरावती विभाग अमरावती यांचा राहील.

२) अपंगाची पदे भरतांना सामान्य प्रशासन विभागाचे परिपत्रक, दि.१९.०३.२०१० मधील सूचनेनुसार अपंगाची पदे सामाजिक प्रवर्गात दर्शविण्यात आलेली नाहीत. मात्र गुणवत्तेनुसार निवड झालेले उमेदवार ज्या प्रवर्गाचे असतील त्याच सामाजिक प्रवर्गात समांतर आरक्षण म्हणून सामावून घेण्यात येईल. अशा परिस्थितीत जेव्हां अपंगाची पदे भरण्यात येईल तेवढी पदे त्या सामाजिक आरक्षणातील समांतर आरक्षणा व्यतिरिक्त इतर पदामधुन कमी करण्यात येईल.

**परिक्षेचे वेळापत्रक**

| | | |
|---|---|---|
| १ | ऑनलाईन पध्दतीने अर्ज करण्याचा (सुरू होण्याचा) दिनांक | २६/०५/२०१७ |
| २ | ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरण्याचा अंतीम दिनांक | १२/०६/२०१७ |
| ३ | संगणकीय चलानाद्वारे स्टेट बँक ऑफ इंडिया च्या शाखेमध्ये परिक्षा शुल्क स्वीकृतीचा कालावधी | १३/०६/२०१७ |
| ४ | परिक्षेसाठी ऑनलाईन प्रवेशपत्र उपलब्ध होण्याचा दिनांक | परिक्षेच्या आठ दिवस अगोदर |
| ५ | ऑनलाईन परिक्षेचा दिनांक | संकेत स्थळावर नंतर प्रसिध्द करण्यात येईल |

**१) वेतन श्रेणी -** पुरवठा निरीक्षक संवर्ग (रु. ५२००-२०२००, ग्रेड पे - रु. २८००) तसेच महागाई भत्ता व नियमाप्रमाणे देय इतर भत्ते.

**२)शैक्षणिक अर्हता -**

अ) उमेदवार मान्यता प्राप्त (सांविधीक विद्यापीठ) विद्यापिठाचा पदवीधर असणे आवश्यक आहे. परंतू 'अन्न तंत्रज्ञान ' किंवा 'अन्न विज्ञान' विषयामध्ये पदवी धारण करणा-या उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल.

ब) उमेदवारास मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे.

क) MSCIT ची परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. तथापि, शासन निर्णय, माहिती तंत्रज्ञान (सामान्य प्रशासन विभाग) क्र. मातंस २०१२/प्र.क्र. २७७/३९, दि. ४.२.२०१३ मध्ये नमूद केलेल्या संगणक/माहिती तंत्रज्ञान विषयक ८६ प्रमाणपत्रांपैकी कोणतेही एक प्रमाणपत्र धारक असावा.

**३) वयोमर्यादा -**

अ) खुल्या प्रवर्गातील उमेदवारांचे वय दि. १ मे, २०१७ रोजी किमान १८ वर्षे पुर्ण व कमाल ३८ वर्षा पेक्षा जास्त नसावे.

ब) महाराष्ट्र शासनाने मान्यता दिलेल्या सर्व मागासवर्गीय उमेदवारांच्या बाबतीत वरील अर्हता ५ वर्षापर्यंत शिथील करण्यात येईल.

क) पदवीधर, अंशकालीन उमेदवारांसाठी वयोमर्यादा, उमेदवाराच्या वयाच्या ४६ वर्षापर्यंत शिथील राहील.

ड) प्रकल्पग्रस्त / भुकंपग्रस्त / १९९४ नंतरचे निवडणूक कर्मचारी / १९९१ चे जनगणना कर्मचारी/ स्वातंत्र्यसैनिकांचे पाल्य/अपंग/या प्रवर्गातील उमेदवारांसाठी वयोमर्यादा उमेदवाराच्या वयाच्या किमान १८ व कमाल ४५ वर्षापर्यंत शिथील राहील.

इ) माजी सैनिकांसाठी विहीत वयोमर्यादेतील सवलत, सामान्य प्रशासन विभाग शासन शुध्दीपत्रक क्र. मासैक-१०१०/प्र.क्र. २७९/१०१६-अ, दि. २०.०८.२०१० मधील तरतुदीप्रमाणे शिथिलता देण्यात येईल.

ई) खेळाडूंची गुणवत्ता व पात्रता विचारात घेऊन सदर पदांसाठी असलेल्या वयोमर्यादेत ५ वर्षापर्यंत वयाची अट शिथीलक्षम असेल.

उ) अपंग उमेदवारांसाठी कमाल वयोमर्यादा ४५ वर्षापर्यंत शिथील राहील.

**४) पात्रतेच्या अटी व शर्ती -**

अ) उमेदवार हा महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा. महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असल्याबाबत सक्षम अधिका-याचे प्रमाणपत्र आवश्यक राहील.

ब) मागासवर्गीय उमेदवारांनी ननीकचे कालावधीतील सक्षम प्राधिकारी यांनी दिलेले जाती प्रमाणपत्र आवश्यक राहील. मागासवर्गीय उमेदवारांसाठी उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे सक्षम अधिका-यांचे वैध प्रमाणपत्र आवश्यक राहील.

क) महिला उमेदवारांनी पुर्वाश्रमीच्या नावाने ( लग्नापुर्वीच्या) अर्ज करणे आवश्यक आहे.

ड) पुरवठा निरीक्षक संवर्गातील पदांकरीता निवड झालेल्या उमेदवार शासन निर्णय, माहिती तंत्रज्ञान (सामान्य प्रशासन विभाग) क्र. मातंस २०१२/प्र.क्र. २७७/३९, दि. ४.२.२०१३ मध्ये नमूद केलेल्या संगणक/माहिती तंत्रज्ञान विषयक ८६ प्रमाणपत्रांपैकी कोणतेही एक प्रमाणपत्र धारक असावा.तसेच मराठी व हिंदी मधील विहीत केलेल्या भाषा परिक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

इ) पुरवठा निरीक्षक संवर्गातील पदांसाठी निवड झालेल्या उमेदवारांना पुरवठा निरीक्षक, गोदाम व्यवस्थापक

श्रेणी - २, धान्य खरेदी निरीक्षक, प्रथम श्रेणी लिपीक, वरिष्ठ लिपीक, अव्वल कारकून यापैकी कोणत्याही पदांवर **अमरावती विभागाअंतर्गत येणा-या कोणत्याही जिल्हयात नियुक्ती देण्यात येईल.** याबाबत उमेदवारांच्या पसंतीचा विचार केल्या जाणार नाही.

ई) अपंग उमेदवाराची पात्रता शासनाने वेळोवेळी निर्गमीत केलेल्या आदेशानुसार राहील. अपंगासाठी आरक्षीत असलेल्या पदांवर कोणत्याही सामाजीक आरक्षणातील / प्रवर्गातील उमेदवार अर्ज करू शकतात.

उ) अपंग उमेदवारांना लेखी परीक्षेच्या वेळी लेखनिकाची मदत आवश्यक असल्यास त्यांनी या कार्यालयाची लेखी पुर्वपरवानगी घेणे बंधनकारक राहील. लेखनिकाची शैक्षणीक पात्रता , पदांस आवश्यक असलेल्या शैक्षणीक पात्रतेपेक्षा एक पायरी / टप्पा कमी असावी. तसा अर्ज लेखनिकाच्या सविस्तर तपशिलासह सदस्य सचिव, तथा उपआयुक्त (पुरवठा), विभागीय निवड समिती, विभागीय आयुक्त कार्यालय, अमरावती यांचेकडे परिक्षेच्या किमान दहा दिवस आधी सादर करावा. उमेदवाराने स्वतः लेखनिकाची व्यवस्था करावयाची आहे. ऐनवेळी लेखनिकाच्या मदतीची परवानगी देता येणार नाही. उमेदवाराने स्वतः लेखनिकाची व्यवस्था केल्यास त्याच्या मानधनाची व्यवस्था उमेदवारांकडून करण्यात येईल.

ऊ) निवड होणा-या उमेदवारांना नियुक्ती दिल्यानंतर नवीन परिभाषीत अंशदान निवृत्ती योजना लागू राहील.

### ५) परिक्षा शुल्क

| पदाचे नाव | खुला प्रवर्ग | राखीव प्रवर्ग |
|---|---|---|
| पुरवठा निरीक्षक संवर्ग | रु. ३००/- | रु. १५०/- |

**अ)** माजी सैनिकांसाठी परिक्षा शुल्क आकारल्या जाणार नाही.

**ब)** परिक्षा शुल्क भरल्याबाबतची बँक चालानची प्रत कागदपत्रे तपासणीचे वेळी सादर करणे आवश्यक आहे.

**क)** सेवायोजन कार्यालय, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, जिल्हा सैनिक मंडळाकडील उमेदवारांनी तसेच प्रकल्पग्रस्त, अंशकालीन उमेदवारांनी देखील अधिकृत वेबसाईटवर विहीत मुदतीत ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करणे आवश्यक आहे. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्विकारले जाणार नाही अथवा उमेदवारांना या कार्यालयामार्फत स्वतंत्रपणे कळविले जाणार नाही.

### ६) महिला उमेदवारांकरीता

खुल्या प्रवर्गातील तसेच उन्नत आणि प्रगत (क्रिमिलेअर) गटातील व्यक्ती / कुटूंबातील महिला उमेदवारांना तसेच मागासवर्गीय प्रवर्गातील इतर मागास वर्ग , वि.जा. (अ), भ.ज.(ब), भ.ज.(क) व भ.ज.(ड) महिलांसाठी असलेले ३० टक्के आरक्षण अनुज्ञेय राहणार नाही.

### ७) माजी सैनिक उमेदवारांसाठी

अ) माजी सैनिक या समांतर आरक्षणातील पदांकरीता आवेदनपत्र सादर करतांना माजी सैनिक म्हणून शासन सेवेकरीता उमेदवार पात्र असावा.

ब) माजी सैनिक या समांतर आरक्षणाचा यापुर्वी लाभ घेऊन शासकीय सेवेत नोकरी स्वीकारली असेल तर उमेदवार समांतर आरक्षणाचे लाभास पात्र राहणार नाही, मात्र तो केवळ वयाची सवलत घेण्यास पात्र राहील.

### ८) अंशकालीन पदवीधर उमेदवारांकरीता

अंशकालीन पदवीधर/पदवीकाधारक उमेदवारांनी जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्रात अद्यावत नोंदणी केलेली असावी.

### ९) प्रकल्पग्रस्त / भुकंपग्रस्त उमेदवारांकरीता

प्रकल्पग्रस्त उमेदवारांनी प्रकल्पग्रस्त असल्याबाबत संबंधित जिल्हा पुनर्वसन अधिका-यांकडील प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

### १०) अपंग उमेदवारांकरीता

अ) अपंग व्यक्तिसाठी आरक्षित पदावर नियुक्तीकरीता संबंधित व्यक्तीने त्या पदासाठी असलेली विहीत अर्हता

धारण करणे आवश्यक आहे. तसेच त्या पदावर काम करण्यास सक्षम असला पाहीजे.

ब) अपंग उमेदवारांनी अपंग असल्याचे जिल्हा शल्य चिकित्सक / वैद्यकीय मंडळाच्या प्रमाणपत्राची साक्षांकीत प्रत जोडणे आवश्यक आहे.(अपंग व्यक्ती समान संधी हक्कांचे संरक्षण संपुर्ण सहभाग अधिनियम १९९५ मधील तरतुदीनुसार किमान ४० टक्के अपंगत्व असलेले अपंग उमेदवार पात्र असतील)

**११) खेळाडू उमेदवारांकरीता**

खेळाडू उमेदवारांनी खालीलपैकी पात्रता धारण करणे आवश्यक आहे.

**अ)** वैयक्तीक अथवा सांघीक क्रिडा स्पर्धांमध्ये किमान राज्यस्तरीय अजिंक्यपद स्पर्धेत प्रथम, व्दितीय व तृतीय स्थान प्राप्त केल्याचे किंवा सुवर्ण, रौप्य किंवा कास्य पदक प्राप्त केल्याचे प्रमाणपत्र.

**ब)** राज्य अजिंक्यपद स्पर्धा या खेळांच्या स्पर्धा महाराष्ट्र ऑलिंपिक असोसिएशनशी संलग्न असलेल्या अधिकृत राज्य संघटनेने आयोजीत केलेल्या असाव्या अथवा महाराष्ट्र ऑलिंपिक असोसिएशनने स्वत: आयोजीत केलेल्या असाव्यात. किमान प्राविण्यापेक्षा उच्च स्तरावरील क्रिडा प्राविण्य मिळविणा-या उमेदवारास प्राधान्य दिले जाईल. वैयक्तिकरित्या किंवा आमंत्रीत स्वरुपाच्या स्पर्धांमध्ये भाग घेतलेल्या खेळाडूंचा यासाठी विचार केला जाणार नाही.

**क)** राष्ट्रीय छात्र सेनेमध्ये (एन.सी.सी.) अंडर ऑफीसरचे पद मिळवून राष्ट्रीय छात्रसेनेच्या राष्ट्रीय स्पर्धांमध्ये पदके प्राप्त केलेली व्यक्ती.

**ड)** भारतीय खेळ प्राधिकरणाने आयोजीत केलेल्या राष्ट्रीय शालेय स्पर्धांमध्ये प्रथम, व्दितीय व तृतीय स्थान प्राप्त करणा-या किंवा सुवर्ण, रौप्य किंवा कांस्य पदक प्राप्त केलेले खेळाडू .

**इ)** भारतीय खेळ प्राधिकरणाने आयोजीत केलेल्या राष्ट्रीय व राज्य स्तरावरील ग्रामीण व महिला क्रिडास्पर्धांमध्ये प्रथम, व्दितीय व तृतीय स्थान प्राप्त करणा-या सुवर्ण, रौप्य किंवा कांस्य पदक प्राप्त केलेले खेळाडू.

**फ)** भारतीय शालेय खेळ महासंघ यांनी आयोजीत केलेल्या राष्ट्रीय व राज्य स्तरावरील शालेय क्रिडा स्पर्धांमध्ये प्रथम, व्दितीय व तृतीय स्थान प्राप्त करणा-या किंवा सुवर्ण, रौप्य किंवा कांस्य पदक प्राप्त केलेले खेळाडू.

**१२) स्वातंत्र्य सैनिकाच्या नामनिर्देशीत पाल्यांना** आरक्षण नसून नियुक्तीकरीता पसंती क्रम आहे. त्यामुळे जाहीरातीनुसार अर्ज करतांना तसेच अर्जात नामनिर्देशित केलेले आहेत किंवा कसे? याबाबत नमूद करावेत.

**१३) समांतर आरक्षणाबाबत** शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक एसआरव्ही २०१२/प्र.क्र.१६/१२/१६-अ, दि. १३ ऑगस्ट २०१४ नुसार कार्यवाही करण्यात येईल.

**१४) निवड पध्दती -**

**अ)** पुरवठा निरीक्षक या पदाच्या लेखी परीक्षेला मराठी, इंग्रजी, सामान्य ज्ञान व बौध्दीक चाचणी या विषयाच्या प्रश्न पत्रिकेचा दर्जा, भारतातील मान्यताप्राप्त विद्यापिठाच्या पदवी परीक्षेच्या दर्जाच्या समान असेल व मराठी या विषयाच्या प्रश्नपत्रिकेचा दर्जा माध्यमिक शालान्त परीक्षेच्या (इयत्ता १० वी) च्या दर्जाच्या समान राहील. सदर परिक्षा इंग्रजी विषय वगळता अन्य विषयाची परीक्षा मराठी भाषेतून घेण्यात येईल. परीक्षेचा कालावधी २ तास राहील.

**ब)** या परिक्षेच्या प्रश्नपत्रीका वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरुपाच्या असतील. उमेदवारास गुणवत्तापात्र ठरण्यासाठी लेखी परीक्षेत किमान ४५ % गुण प्राप्त करणे आवश्यक राहील.

**क)** वस्तुनिष्ठ स्वरुपाच्या उत्तरपत्रीकांचे मुल्यांकन करतांना उत्तरपत्रिकेत नमूद केलेल्या योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच प्रत्येक चार चुकीच्या उत्तरामागे एका प्रश्नाचे गुण एकुण गुणांमधून वजा करण्यात येतील.

**ड)** परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या गुणवत्ता प्राप्त उमेदवारांची गुणवत्ता यादी तयार करून संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. त्यानंतर गुणवत्ता प्राप्त उमेदवारांचे मुळ दस्तऐवजांची पडताळणी करून पात्र उमेदवारांची अंतीम निवड यादी संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

**१५) ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करण्याची प्रक्रिया खालीलप्रमाणे आहे.**

अ) प्रोफाईल निर्मिती / प्रोफाईल अद्यावत करणे.

ब) अर्ज सादरीकरण.

क) शुल्क भरणा.

**१६) प्रोफाईल निर्मिती / प्रोफाईल अद्यावत करणे.**

अ) https://maharecruitment.mahaonline.gov.in व http://amravatidivision.gov.in या संकेतस्थळावर वापरकर्त्याने प्रोफाईल निर्मिती करण्याकरीता नवीन वापरकर्त्याची नोंदणी वर क्लिक केल्यानंतर यंत्रणा लॉग-इन पृष्ठ प्रदर्शित करेल. नविन खाते (वापरकर्त्याचे नाव Login व Password) निर्माण करण्यासाठी लॉगइन पृष्ठाद्वारे विचारलेली माहिती भरून नोंदणीची प्रक्रिया पूर्ण करावी.

ब) प्रोफाईलद्वारे माहिती भरतांना उमेदवाराने स्वत:चाच ई-मेल आयडी व भ्रमणध्वनी क्रमांक असणे आवश्यक आहे.

क) उमेदवारांकडे नित्य वापरात असेल असा ई - मेल आयडी व भ्रमणध्वनी क्रमांक असणे आवश्यक आहे, तसेच भरतीप्रक्रिये दरम्यान पत्रव्यवहार, प्रवेशपत्र आणि इतर माहिती ऑनलाईन देण्यात येणार असल्याकारणामुळे भरती प्रक्रियेच्या संपूर्ण कालावधीमध्ये नोंदणीकृत सदर ई मेल आयडी व भ्रमणध्वनी क्रमांक वैध /कार्यरत राहणे आवश्यक आहे.

ड) वरीलप्रमाणे प्रोफाईलची निर्मिती झाल्यानंतर वापरकर्त्याने स्वत:च्या Login व Password द्वारे प्रवेश करून प्रोफाईल मध्ये विचारलेली वैयक्तिक माहिती, संपर्क तपशिल, इतर माहिती , शैक्षणीक अर्हता, अनुभव इत्यादी संदर्भातील तपशिलाची अचूक नोंद करावी.

इ) ऑनलाईन पध्दतीने अर्ज करतांना उमेदवाराने स्वत:चा रंगीत (coloured) अद्यावत फोटो (रूंदी ३.० सेमी x उंची ४.५ सेमी) व स्वत:ची स्वाक्षरी (रूंदी ३.० सेमी x उंची २.५ सेमी) आणि ३०० DPI Resolution आणि ५० KB पेक्षा कमी साईज होईल अशा विहीत पध्दतीने स्कॅन करून अपलोड करणे अनिवार्य आहे. (टिप - फोटो व स्वाक्षरी अपलोड केल्यानंतर उमेदवाराने त्यांचाच फोटो व स्वाक्षरी अपलोड झाल्याची खात्री करावी) प्रवेशपत्रावर/ अर्जावर दुस-याचा फोटो / स्वाक्षरी असल्यास उमेदवारास निवडीच्या टप्प्यामध्ये प्रवेश दिला जाणार नाही.

ई) स्कॅन करून अपलोड केलेली स्वाक्षरी, प्रवेशपत्र/हजेरीपट व तत्सम कारणासाठी वापरण्यात येईल. परीक्षेच्या वेळी, प्रत्यक्ष कागदपत्रे तपासणीच्या वेळी व अन्य कोणत्याही वेळी अर्ज भरतांना केलेली स्वाक्षरी व फोटो न जुळल्यास उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल.

**१७) ऑनलाईन अर्ज सादरीकरण**

अ) दिलेल्या संकेतस्थळावर वापरकर्त्याने स्वत:च्या युजर आयडी व पासवर्डद्वारे यशस्वीरीत्या प्रवेश (Login) केल्यानंतर **'ऑनलाईन अर्ज '** येथे क्लिक करावे.

ब) उमेदवाराच्या प्रोफाईलच्या आधारे यंत्रणा वैधता तपासेल. वापरकर्ता जाहिरातीतील निकष पूर्ण करित असल्यास वापरकर्त्याला अर्ज सादर करता येईल.

क) जाहिरातीमध्ये नमूद केलेले निकष वापरकर्ता पूर्ण करीत नसल्यास माहिती संग्रहीत होऊ शकत नाही असा संदेश यंत्रणा प्रदर्शित करेल. अर्ज यशस्वीरीत्या सादर झाल्यानंतर तुमचा अर्ज यशस्वीरित्या सादर झाल्यानंतर तुमचा अर्ज यशस्वीरीत्या जतन झाला असा संदेश यंत्रणा प्रदर्शित करेल.

ड) 'रक्कम भरा' या पर्यायावर क्लिक करून अर्जदाराला क्रेडीट कार्ड / डेबीट कार्ड / नेट बँकींग द्वारे भरणा करता येईल अथवा अर्जदार ऑनलाईन अर्ज सादर करून भारतीय स्टेट बँकेमध्ये चालानद्वारे शुल्काचा भरणा करण्याचा पर्याय स्वीकारू शकेल.

**१८) ऑनलाईन शुल्क भरणा**

यशस्वीरीत्या अर्ज केल्यानंतर परीक्षा शुल्काचा भरणा करण्याकरीता खाली नमूद केलेल्या पध्दतीचा अवलंब करावा.

अ) शुल्क भरण्याकरीता मुख्य पृष्ठाच्या डाव्या भागावरील 'माझे खाते' या लिंकवर क्लिक करावे.

ब) 'माझे खाते' या लिंक वर क्लिक केल्यानंतर अर्ज केलेल्या कार्यालयाचे नाव निवडल्यानंतर उमेदवाराने अर्ज केल्याची माहिती शुल्क भरल्याच्या / न भरल्याच्या नोंदीसह दिसेल. पदासमोर - 'unpaid' असे लिहीलेले असेल, त्या ठिकाणी 'Pay Now' अशी लिंक उपलब्ध असेल.

क) 'Pay Now' या लिंकवर क्लिक केल्यानंतर तीन पर्याय उपलब्ध होतील (१) ऑनलाईन पेमेंट, (२)चलानद्वारे. (३) क्रेडीट कार्ड, डेबीट कार्ड अथवा नेट बँकींगच्या सहाय्याने ऑनलाईन पेमेंट करता येईल.

ड) चलानद्वारे पर्याय निवडल्यास, उपलब्ध होणा-या चलानची प्रत घेऊन भारतीय स्टेट बँकेच्या कोणत्याही शाखेत,

बँकेच्या कार्यालयीन वेळेत शुल्काचा भरणा केला जाऊ शकतो.

इ) भारतीय स्टेट बँकेमध्ये चालान द्वारे शुल्क भरावयाचा पर्याय निवडल्यास अर्ज सादर केल्याच्या दोन तासानंतर अथवा शेवटच्या दिवशी अर्ज सादर केल्यास त्यापुढील कामकाजाच्या दिवशी बँकेच्या कार्यालयीन वेळेत परिक्षा शुल्क भरणे आवश्यक राहील.

ई ) चलानद्वारे शुल्क स्विकारण्याकरीता भारतीय स्टेट बँक उमेदवाराकडून परिक्षा शुल्क व्यतिरिक्त नियमानुसार सेवा शुल्क आकारेल. अशा प्रकारे उमेदवारास चलानद्वारे शुल्क भरतांना परिक्षा शुल्क + बँकेचे सेवा शुल्क भरावे लागतील.

**१९) ऑनलाईन परिक्षा**

अ) परिक्षेसाठी मराठी - इंग्रजी भाषा,सामान्य ज्ञान, बुध्दिमत्ता चाचणी इत्यादी विषयावर वस्तुनिष्ठ बहुपर्यायी प्रश्न असतील.

ब) सदर परिक्षेद्वारा उमेदवाराची शैक्षणीक अर्हता, कामाचे स्वरुप, भाषा, सामान्यज्ञान, बुध्दिमापन चाचणी, उमेदवाराचा कल, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाशी संबधित माहिती इत्यादी बाबींचे ज्ञान जाणून घेणे राहील.

**२०) परिक्षा केंद्र**

अ) परिक्षा केंद्र अमरावती मुख्यालयी, विभागातील जिल्हयाचे ठिकाणी तसेच परिक्षेला बसणा-या उमेदवारांची संख्या विचारात घेऊन इतर ठिकाणी सुध्दा राहू शकेल.

ब) परिक्षेच्या वेळी उमेदवाराने प्रवेश पत्र आणणे अनिवार्य आहे. उमेदवाराने प्रवेशपत्राशिवाय स्वतःचे छायाचित्र असलेले ओळखपत्र जवळ बाळगणे आवश्यक राहील. (उदा. आधार कार्ड, पॅन कार्ड, निवडणूक ओळखपत्र, वाहन परवाना)

**२१) अर्ज सादर करण्याबाबत आवश्यक सूचना**

अ) उमेदवारांनी https://maharecruitment.mahaonline.gov.in व http://amravatidivision.gov.in या संकेतस्थळावर जाऊन जाहिरात सविस्तर अभ्यासावी, भरावयाची सर्व माहिती आपल्याकडे उपलब्ध आहे याची खात्री करावी व नंतर आपला अर्ज भरावा, अर्ज फक्त ऑनलाईन पध्दतीने स्वीकारला जातील.

ब) पात्र उमेदवाराला वेब बेस्ड (web based) ऑनलाईन अर्ज दि. २६/०५/२०१७ ते १२/०६/२०१७ या कालावधीतच संकेतस्थळावर सादर करणे आवश्यक राहील.

क) बँक चालान तथा इतर पर्यायाद्वारे भरण्यात येणारे परिक्षा शुल्क हे ना परतावा असेल. त्यामुळे एकदा भरलेले शुल्क अर्जदारास कोणत्याही परिस्थितील परत केले जाणार नाही. सदर परिक्षा शुल्क अहस्तांतरणीय आहे.

ड) उमेदवाराने ऑनलाईन अर्ज भरतांना सर्व माहिती काळजीपुर्वक भरावी. योग्य त्या ठिकाणी आवश्यक माहिती भरावी व अर्ज सादर (Submit) करावा. सादर केलेल्या अर्जाची प्रिंट आऊट काढून घ्यावी. इंटरनेटवर उपलब्ध होणारा नोंदणी क्रमांक जपून ठेवावा. **ऑनलाईन अर्ज भरल्यानंतर मुळ अर्जाची प्रत या कार्यालयाकडे पाठवू नये, सदर मुळ अर्ज कागदपत्र पडताळणीचे वेळी सादर करावेत.**

इ) उमेदवारास कोणत्याही इंटरनेट कॅफे किंवा इंटरनेट सुविधा उपलब्ध असलेल्या संगणकावरून अर्ज भरता येईल.

ई) वय, शैक्षणीक अर्हता, मागास प्रवर्ग/ नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र, अपंग, महिला, माजी सैनिक, पात्रता इत्यादी संदर्भात न चुकता अर्जामध्ये स्पष्टपणे / निर्विवादपणे दावा करणे आवश्यक आहे. अर्जातील संबंधित रकान्यात स्पष्टपणे दावा केला नसल्यास संबंधित दाव्याचा विचार केला जाणार नाही . उमेदवाराने ऑनलाईन अर्ज भरल्यानंतर त्यामध्ये कोणत्याही प्रकारचा बदल करता येणार नाही.

फ) वयाच्या पुराव्यासाठी सक्षम प्राधिका-याने दिलेला जन्माचा दाखला, शाळा सोडल्याचा दाखला, एस.एस.सी. परिक्षा उत्तीर्ण प्रमाणपत्र , वय व अधिवासाबाबत शासनाकडील सक्षम प्राधिका-याने दिलेले प्रमाणपत्र ग्राहय धरण्यात येईल.

ग) एस.एस.सी. प्रमाणपत्र अथवा शाळा सोडल्याचा दाखला, जन्माचा दाखला व प्रमाणपत्रावरील जन्म दिनांकानुसार अर्जामध्ये जन्म दिनांक निवडावा.

ह) शैक्षणीक अर्हते संदर्भात आवश्यक माहिती दिलेल्या क्रमाने नमूद करावी. संबधित परिक्षेच्या गुणपत्रीकेवरील दिनांक हा शैक्षणीक अर्हता धारण केल्याचा दिनांक समजण्यात येईल व त्याआधारे उमेदवाराची पात्रता ठरविण्यात येईल.

ळ)अर्जात हेतूपुरस्पर खोटी माहिती देणे किंवा त्यात बदल करणे किंवा दाखल्यांच्या प्रतीतील नोंदीत अनधिकृतपणे खाडाखोड करणे किंवा खाडाखोड केलेले बनावट दाखले सादर करणे, परिक्षा कक्षात गैरवर्तन, परिक्षेचे वेळी नक्कल करणे, वशिला लावण्याचा प्रयत्न करणा-यांना शिक्षा करण्याचा तसेच प्रचलित कायदा व नियमांचे अनुषंगाने योग्य ती कार्यवाही करण्याचा अधिकार विभागीय निवड समितीला राहील, तसेच विहीत केलेल्या अर्हतेच्या अटी पुर्ण न करणारा अथवा गैरवर्तणूक करणारा उमेदवार कोणत्याही टप्प्यांवर निवड होण्यास अपात्र ठरेल.

श) पुरवठा निरीक्षक पदभरतीकरीता ऑनलाईन अर्ज सादर केलेल्या उमेदवारांकरीता आवश्यक सूचना तसेच इतर आनुषंगीक माहिती उपरोक्त संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. त्यामुळे सदर संकेतस्थळावर वारंवार भेटी देऊन पदभरती प्रक्रियेची अद्यावत माहिती उपलब्ध करून घेण्याची जबाबदारी आवेदकांची राहील. सदर पदभरतीचे अनुषंगाने कार्यालयामार्फत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही याची आवेदकांनी कृपया नोंद घ्यावी.

व) परिक्षेचे प्रवेशपत्र https://maharecruitment.mahaonline.gov.in व http://amravatidivision.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करून देण्यात येणार आहे. त्यामुळे अर्ज भरल्यानंतर इंटरनेटवर उपलब्ध होणारा नोंदणी क्रमांक जपून ठेवावा.

**२२) उमेदवारांकरीता महत्वाची सूचना**

अ) जाहिरातीमध्ये नमूद केलेल्या पदसंख्येत व आरक्षणामध्ये शासनाच्या सुचनेनुसार बदल होऊ शकते, याबाबत शासनाचा निर्णय अंतीम असेल, काही अपरिहार्य कारणाने परिक्षा स्थगित झाल्यास अथवा रद्द झाल्यास त्याबाबत अर्जदाराला कोणताही दावा सांगता येणार नाही. परिक्षेचे स्वरूप, पदांची संख्या तसेच सेवाभरती प्रक्रियेत बदल करणे याबाबतचे सर्व अधिकारी विभागीय निवड समिती स्वतःकडे राखून ठेवत आहे. भरती प्रक्रिये संदर्भात उद्भवणारे वाद , तक्रारी याबाबत समितीचा निर्णय अंतीम राहील.

ब) ऑनलाईन अर्ज सादर केलेल्या उमेदवारास कागदपत्राच्या छाननी शिवाय परिक्षेस बसण्याची परवानगी देण्यात येत आहे. त्यामुळे उमेदवार परिक्षा पास झाल्यानंतर प्रवर्ग निहाय, गुणानुक्रमे उमेदवाराच्या मुळ कागदपत्राची तपासणी केल्यानंतरच गुणवत्तेनुसार तात्पुरती निवड यादी प्रसिध्द करण्यात येईल. केवळ परिक्षा उत्तीर्ण झाल्यामुळे उमेदवारास नोकरीचा कोणताही हक्क प्राप्त होणार नाही. त्यामुळे उमेदवाराने संबधित पदाच्या पात्रतेच्या अटी अभ्यासूनच अर्ज सादर करावा.

क) भरती प्रक्रियेसंदर्भातील सर्व माहिती व त्याअनुषंगाने होणा-या बदलाबाबतची सर्व माहिती https://maharecruitment.mahaonline.gov.in व http://amravatidivision.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध होईल, या व्यतिरिक्त कोणत्याही माध्यमाद्वारे भरती प्रक्रियेची माहिती उपलब्ध होणार नसल्याने दिलेले संकेतस्थळाचे वेळोवेळी अवलोकन करावे.

ड) ऑनलाईन प्रक्रियेबाबत तसेच सदर जाहिराती संदर्भात कोणतीही अडचण आल्यास महाऑनलाईनच्या वेबसाईटवर नमूद हेल्पलाईनवर संपर्क करू शकतात.

**२३)** गुणानुक्रमे लेखी परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांनी कागदपत्राचे तपासणीचे वेळी सादर करावयाचे मुळ दस्तऐवज.

अ. मुळ अर्ज प्रतिज्ञापत्रासह, चलान,लहान कुटुंबाबाबतचे प्रतिज्ञापन यांच्या मुळ प्रती.

ब. शैक्षणीक अर्हतेचे प्रमाणपत्र (एस.एस.सी. पासून)

क. वयासंबधि दाखला (जन्माचा दाखला / शाळा सोडण्याचे प्रमाणपत्र)

ड. जातीचे प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र

इ. अधिवास प्रमाणपत्र

ई. नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र (विमुक्त जाती व भटक्या जमाती / इतर मागास बर्ग करीता आवश्यक) सदर प्रमाणपत्र जाहिरातीच्या प्रसिध्दी दिनांकास वैध असणे आवश्यक आहे. वैध प्रमाणपत्र नसलेल्या उमेदवारांचा विचार केल्या जाणार नाही व अशा उमेदवारांना राखीव संवर्गाचा लाभ घेता येणार नाही. खुल्या प्रवर्गातील महिला उमेदवारास महिला आरक्षणा करिता शा. नि. क्र. ८२/२००१/मसेआ २०००/प्र.क्र. ४१५/का -२, दि. २५.५.२००१

नुसार उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे विहीत नमुन्यातील सक्षम प्राधिकारी यांचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

उ. अपंग उमेदवाराने किमान ४० टक्के अपंगत्व असल्याबाबतचे जिल्हा शल्य चिकीत्सक /वैद्यकीय मंडळाचे प्रमाणपत्र.

ऊ. समांतर आरक्षणाअंतर्गत अर्ज केलेल्या उमेदवारांना वर नमुद करण्यात आलेल्या दाखल्या व्यतिरिक्त समांतर आरक्षणाचे प्रमाणपत्र.

ए. सामान्य प्रशासन विभाग शा. नि. क्रं. प्र. अ. क्रं. १००५/प्र.क्रं. ३६/०५/६ - अ, दिनांक २६.५.२००५ नुसार लहान कुटूंब असल्याचे विहीत नमुन्यातील प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक आहे. नमुना जोडलेला आहे.

ऐ. शासकीय / निमशासकीय कर्मचारी असल्यास सक्षम प्राधिका-यांची मंजूरी घेतल्याचे ना-हरकत प्रमाणपत्र.

२४) ऑनलाईन पध्दतीने उमेदवारांनी अर्ज सादर करतेवेळी वर नमूद केल्याप्रमाणे आवश्यक प्रमाणपत्र नसल्याचे निदर्शनास आल्यास तसेच अर्जात नमूद केलेली माहिती खोटी आढळल्यास निवड प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर त्यांना अपात्र ठरविण्यात येईल किंवा नियुक्ती दिल्यानंतर निदर्शनास आल्यास त्यांची नियुक्ती रद्द करण्यात येईल व त्यानंतर याबाबत उमेदवाराची कोणत्याही प्रकारची तक्रार ऐकून घेतली जाणार नाही.

२५) उमेदवारांना परिक्षेकरीता स्वखर्चाने उपस्थित राहावे लागेल.

२६) सदर नियुक्त्या या तात्पुरत्या स्वरुपाच्या राहतील तसेच १ वर्षाच्या परिविक्षाधिन कालावधी असेल.

२७) शासकीय सेवेत नियुक्ती झाल्यानंतर संबंधित उमेदवाराने सहा महिन्याच्या आत वैदयकीय दृष्टया सक्षम असल्याचे जिल्हा शासकीय रूग्णालयातील वैदयकीय प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे.

२८) शासकीय सेवेमध्ये संबंधित उमेदवाराची नियुक्ती त्याचे पूर्वचारित्र्य व वर्तणूक (पोलीस चौकशी) यांच्या समाधानकारक तपासणी अहवालावर अवलंबून राहील व तसा तपासणी अहवाल आक्षेपार्ह असल्यास संबंधित उमेदवाराची नियुक्ती रद्द करण्यात येईल. अशा प्रकरणी सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्रमांक चाअप १०१२/प्र.क्र. ६३/१६ -अ, दिनांक २६ ऑगस्ट २०१४ नुसार गठीत केलेल्या समितीच्या निर्णयानुसार व परिपत्रकातील मार्गदर्शक सूचनांनुसार कार्यवाही करून योग्य तो निर्णय घेतला जाईल. तसेच, यापूर्वीच संबंधित उमेदवारास नियुक्ती दिली असल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता सेवेतून काढून टाकण्यात येईल.

दिनांक २५/०५/२०१७

स्थळ : अमरावती

**(रमेश मावसकर)**
**सदस्य सचिव,**
**विभागीय निवड समिती**
**तथा उपायुक्त (पुरवठा)**
**अमरावती**

**(जे.पी.गुप्ता)**
**अध्यक्ष,**
**विभागीय निवड समिती**
**तथा विभागीय आयुक्त**
**अमरावती**